## ॥ हस्तामलक स्तोत्रम् ॥

कस्त्वं शिशो! कस्य कुतोऽसि गन्ता
किं नाम ते त्वं कुत आगतोऽसि।
एतन्मयोक्तं वद चार्भक! त्वं
मत्प्रीतये प्रीतिविवर्धनोऽसि॥१॥

आचार्यांनी विचारले, बाळ तू कोण आहेस? कोणाचा आहेस? तुला कोठे जायचे आहे? तुझे नाव काय? तू कुठून आला आहेस? बाळ, माझ्या संतोषासाठी तू या विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दे. तुझ्याकडे पाहून मला मोठा संतोष वाटतो आहे. तू संतोष वाढवणारा आहेस.

यावर त्या पृथ्वीधराने उत्तर दिले ........

नाहं मनुष्यो न च देवयक्षौ
न ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्राः।
न ब्रह्मचारी न गृही वनस्थो
भिक्षुर्न चाहं निजबोधरूपः॥२॥

मी मनुष्य नाही. मी देव नाही अथवा यक्षही नाही. मी ब्राह्मण नाही, क्षत्रिय नाही, वैश्य नाही किंवा शूद्रही नाही. मी ब्रह्मचारी नाही, गृहस्थाश्रमी नाही. मी वानप्रस्थ वा संन्यासी पण नाही. मग मी आहे तरी कोण? मी तर निजबोधस्वरूप आत्मा आहे. मी निजानंद स्वरूप आहे. मी सच्चिदानंदघन परिपूर्ण परब्रह्म आहे.

निमित्तं मनश्चक्षुरादिप्रवृत्तौ
निरस्ताखिलोपाधिकाराकाशकल्पः।
रविर्लोकचेष्टानिमित्तं यथा यः
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा॥३॥



©www.madhaveeraghuveer.com

जो मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार, त्याचप्रमाणे हात, पाय, कान, नाक, डोळे यांच्या प्रवृत्तीचे निमित्त आहे. त्याच्यामुळे हे सर्व आपापले कार्य करण्यासाठी प्रवृत्त होतात. त्याला तत्त्वतः कोणतीही उपाधि नाही. जो आकाशासारखा अत्यंत निर्मळ व सर्वव्यापी आहे. सूर्य जसा सर्व लोकांच्या व्यवहाराला निमित्त होतो. त्याचप्रमाणे सर्व लोकांच्या व्यवहाराला निमित्त होणारा असा जो नित्यज्ञानस्वरूप आत्मा, तोच मी आहे.

यमग्न्युष्णवन्नित्यबोधस्वरूपं
मनश्चक्षुरादीन्यबोधात्मकानि।
प्रवर्तन्त आश्रित्य निष्कम्पमेकं
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥४॥

नेहमी उष्ण असणे हा जसा अग्नीचा स्वभाव आहे. तसेच नित्य ज्ञानस्वरूप असणे हा आत्म्याचा स्वभाव आहे. ~~स्वभावतः~~ मन व डोळे ही इंद्रिये स्वभावतः जडस्वरूप आहेत. परंतु ही इंद्रिये ज्याच्या आश्रयाने आपापले कार्य करण्यास प्रवृत्त होतात. जो निष्कंप म्हणजे स्पंदनरहित अर्थात निर्विकार आहे. एकमेव अद्वितीय, नित्यज्ञानस्वरूप आत्मा, तो मीच आहे.

JANUARY '14

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |
| S | M | T | W | T | F | S |

© www.madhuveeraghuveer.com